सकाळ
पुणे, शुक्रवार, ११ ऑगस्ट २०२३

# खराडीत बी. फार्मसीचा निकाल १०० टक्के

**खराडी, ता. १० :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या खराडी येथील शंकरराव उरसळ फार्मास्युटिकल्स सायन्स अँड रिसर्च सेंटर या महाविद्यालयाच्या अंतिम वर्ष बी. फार्मसी या अभ्यासक्रमाचा निकाल नुकताच जाहीर झाला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने जून २०२३ मध्ये घेतलेल्या परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अंतिम परीक्षेत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली. महाविद्यालयातील निखिल बापसेकर, मानसी मोकाशी, ऋतुजा लवांडे यांनी यश पटकाविले आहे. या वेळी प्रा. डॉ. अशोक भोसले, उपप्राचार्या डॉ. विजया बर्गे, फार्मसीचे विभागप्रमुख डॉ. सुजित काकडे यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.